**बदली समुपदेशन प्रक्रिया पार पाडतांना कोविड १९ या संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना**

जिल्हा परिषद नागपूर
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्र.जिपना/साप्रवि/स्था ३/सिआर /२०२०/ 3602 /
दिनांक :- 15 /०७/२०२०

परिपत्रक

जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत कर्मचा-यांच्या जिल्हा स्तरीय बदल्या ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार करण्याबाबत शासनाने दिनांक ९ जुलै २०२० च्या पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले आहे. त्यानुसार समुपदेशन प्रक्रियेने बदल्यांची कार्यवाही पार पाडावयाची आहे. अशी कार्यवाही अमलात आणतांना कोविड १९ या संसर्गजन्य रोगाचे पार्श्वभुमीवर खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. यासंबधात केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून तत्संबंधी नियमाचे पालन होणे सुरक्षीततेच्या दृष्टीने गरजेचे आहे. या सर्व बाबीचा साकल्याने विचार करून खालीप्रमाणे सूचना अमलात आणण्याचे निदेर्शित करण्यात येत आहे.

१. समुपदेशनाचे ठिकाणी अनावश्यक वर्दळ वाढणार नाही याची दक्षता घेणे.
२. सभागृहाचे प्रवेशद्वारावर थर्मामिटरमध्ये तापमानाची नोंद करण्यात यावी.
३. सभागृहात प्रवेश करतांना मास्क वापरणे बंधनकारक करण्यात येत आहे.
४. कर्मचा-यांनी बसतांना Social distancing चे पालन करावे.
५. प्रवेशदाराजवळ सॅनिटायझरची व्यवस्था करणे.
६. कोविड सदृष्य लक्षणे असणा-या कर्मचा-यांनी स्वतःहून सभागृहात प्रवेश करण्याचे टाळावे.
७. समुपदेशन स्थळ निर्जंतुकीकरण करण्यात यावे.
८. जे कर्मचारी बदलीसाठी पात्र आहेत तथापि शासन धोरणात्मक तरुतुदीनुसार बदलीतून सुट घेण्यास पात्र ठरतात अशा कर्मचा-यांनी परिशिष्ट १ मध्ये परिपूर्ण माहिती भरून त्यांना सुट हवी असल्यास तसे नमूद करून सदर परिशिष्ट १ व त्यासोबत सुट प्राप्तीचा योग्य पुरावा तालुकास्तरावर पंचायत समितीच्या सहाय्यक प्रशासन अधिका-यांकडे दिनांक १७ जुलै २०२० पर्यंत सादर करून पोच प्राप्त करावी. पंचायत समितीच्या सहाय्यक प्रशासन अधिका-यांनी असे परिशिष्ट १ संवर्गनिहाय वेगवेगळे करून संवर्गनियंत्रण अधिका-याकडे दि.२०.७.२०२० रोजी सादर करावे. जिल्हा मुख्यालयात आस्थापना अधिकारी यांनी वरीलप्रमाणेच विकल्प प्राप्त करून सुट प्राप्तीसाठी अशाप्रकारे परिशिष्ट १ सादर करणा-या कर्मचा-यांची माहिती संवर्ग नियंत्रण अधिका-याकडे सादर करावी. अशी माहिती समुपदेशना पूर्वीच प्राप्त झाल्यास अशा कर्मचा-यांना समुपदेशनात प्राधान्याने सहभागी करून घेता येईल. त्यामुळे वर्दळ देखील वाढणार नाही.
९. सभागृहात उपस्थित राहणा-यांचा कर्मचा-यांची उपस्थिती पटावर स्वाक्षरी नोंदवून त्यांच्या भ्रमणध्वनीक्रमांकाची नोंदणी करावी.
१०. समुपदेशनाच्या ठिकाणी १५ कर्मचारी हॉलमध्ये व १५ कर्मचारी गॅलरीमध्ये याप्रमाणे प्रवेश देण्याची कार्यवाही करावी व त्याप्रमाणे संनियंत्रण ठेवावे.

उपरोक्त सूचनेप्रमाणे सर्व विभागप्रमुखांनी व्यवस्था करावी. वरीलप्रमाणे प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीबाबत विभागातील अधिकारी/कर्मचा-यांकडे जबाबदारी सोपविण्यात यावी.

15/07/2020

(योगेश कुंभेजकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर

प्रतिलीपी :

१. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
२. विभाग प्रमुख ...............................................(सर्व), जिल्हा परिषद नागपूर
यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस अगेषित.
४. गट विकास अधिकारी पंचायत समिती ----------------(सर्व) यांना माहितीस व योग्य कार्यवाहीकरिता. सदर परिपत्रक आपले अधिनस्थ क्षेत्रिय कार्यालयास त्यांचे स्तरावरून निर्गमित करावे.
५. निवड नस्ती ( कार्यासन स्था ३ सा.प्र.वि.)

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर

# जिल्हा परिषद, नागपूर
## सामान्य प्रशासन विभाग
## सर्वसाधारण बदली प्रक्रिया २०२०

**जिल्हास्तरीय बदल्यांची कार्यपध्दती.**

| अ.क्र. | कार्यसूची | दिनांक |
|---|---|---|
| | **प्रशासकिय बदल्या.** | |
| १ | अंतरिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १३.०७.२०२० |
| २ | वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. | १६.०७.२०२० |
| ३ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १८.०७.२०२० |
| ४ | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेनाने पार पाडणे. | २१ ते २८ जुलै, २०२० |
| | **विनंती बदल्या.** | |
| १ | अंतरिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १५.०७.२०२० |
| २ | वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. | १७.०७.२०२० |
| ३ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १७.०७.२०२० |
| ४ | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेनाने पार पाडणे. | २१ ते २८ जुलै, २०२० |

**तालुकास्तरीय बदल्यांची कार्यपध्दती.**

| अ.क्र. | कार्यसूची | दिनांक |
|---|---|---|
| | **प्रशासकिय बदल्या.** | |
| १ | अंतरिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १५.०७.२०२० |
| २ | वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. | २०.०७.२०२० |
| ३ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | २२.०७.२०२० |
| ४ | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेनाने पार पाडणे. | ३० व ३१ जुलै, २०२० |
| | **विनंती बदल्या.** | |
| १ | अंतरिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | १५.०७.२०२० |
| २ | वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सूचना मागवणे. | २०.०७.२०२० |
| ३ | आक्षेप व सूचनांचे निराकरण करुन अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे. | २२.०७.२०२० |
| ४ | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेनाने पार पाडणे. | ३० व ३१ जुलै, २०२० |

**बदल्यांचे वेळापत्रक**

**जिल्हास्तरीय बदल्या :- प्रत्यक्ष बदली प्रक्रीया समुपदेशनाने पार पाडने - २१ जुलै ते २८ जुलै, २०२०.**

**जिल्हास्तरीय बदल्या करीता विभाग निहाय समुपदेशन प्रक्रीयेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | विभागाचे नांव | समुपदेशनाची तारीख | समुपदेशनाची वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | पशुसंवर्धन विभाग | २१.०७.२०२० | सकाळी - १०.१५ ते दु. ११.३० | कै. आबासाहेब खेडकर सभागृह जिल्हा परिषद नागपूर |
| २ | कृषि विभाग | | दुपारी - ११.४५ ते दु. ०१:०० | |
| ३ | वित्त विभाग | | दुपारी - ०१.१५ ते दु. ०३.०० | |
| ४ | बांधकाम विभाग | | दुपारी - ०३.१५ ते दु. ०४:३० | |
| ५ | लघू सिंचन विभाग | | दुपारी - ०४.४५ ते सायं. ०६.०० | |
| ६ | शिक्षण विभाग (प्राथ) | २२.०७.२०२० | सकाळी - १०.१५ ते दु. ०२.०० | |
| ७ | महिला व बाल कल्याण विभाग | | दुपारी - ३.०० ते सांय ०६:०० | |
| ८ | ग्रामिण पाणी पुरवठा विभाग | २३.०७.२०२० | सकाळी - १०.१५ ते दु. १२.०० | |
| ९ | आरोग्य विभाग | | दुपारी - १२.३० ते सांय ०६:०० | |
| १० | पंचायत विभाग | २७.०७.२०२० | सकाळी - १०.१५ ते सायं. ०६.०० | |
| ११ | सामान्य प्रशासन विभाग | २८.०७.२०२० | सकाळी- १०.१५ ते सायं. ०५.४५ | |

(योगेश कुंभेजकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर

H:\Gen_Tran _final -2020\G.trans.2020.docx1